# प्रसिद्धिपत्रक

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६**
**फोन नं. ०२०-२६६८५०००**

जा.क्र./पोउआ/वाह/ ११७५ /२०२५ पुणे दिनांक -११/०२/२०२५

पुणे शहरातील कोंढवा वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीत होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका,इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे **अंतिम आदेश** निर्गमित करीत आहे.
“ सदर ठिकाणी यापुर्वी पार्कीग बाबत असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील ”

## कोंढवा वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

**कोंढवा वाहतूक विभाग पुणे अंतर्गत पारगेनगर कोंढवा बु. येथील पारगेनगर चौक ते दगडुदादा कामठे पाटील चौक या मार्गावर तसेच सदर मार्गास जोडणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा वाहतुक सुरु असुन सदर रोडवर खालील प्रमाणे पार्कीग, नो पार्कीग बाबत अंतिम आदेश काढण्यात येत आहे.**

| अ.क्र. | ठिकाण | कोठुन कुठपर्यंत | पार्किग व्यवस्था |
|---|---|---|---|
| १ | कोंढवा वाहतुक विभाग समोरील चौक ते मेरी लीड्स हायस्कुल | रविराज ॲस्टेरीया सोसा. समोरील किचन ५३ ते साऊथ इंडीयन स्नॅक्स सेंटर पर्यंत १४० फुट | फक्त दुचाकी पार्कींग |
| | | रविराज ॲस्टेरीया सोसा. समोरील डुग्गु स्टेशनरी ते कॅफे मालंग पर्यंत १०० फुट | फक्त चारचाकी पार्किग |
| | | वरील जागा वगळुन कोंढवा वाहतुक विभाग समोरील चौक ते मेरी लिड्स हायस्कुल पर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजुस | नो पार्कीग |
| २ | मेरी लिड्स हायस्कुल ते पोकळे मळा चौक | मेरी लिड्स हायस्कुल ते पोकळे मळा चौक पर्यंत सार्वजनिक रोडच्या दोन्ही बाजुस | नो पार्कीग |
| ३ | पोकळे मळा चौक ते ओंकार गार्डन वेलकम हॉल चौक | पोकळे मळा चौक ते ओंकार गार्डन वेलकम हॉल चौक पर्यंत | पी-१ व पी-२ पार्किग |
| ४ | पोकळे मळा चौक ते डी.एस.के.चौक | पोकळे मळा चौक ते डी.एस.के चौक पर्यंत सार्वजनिक रोडच्या दोन्ही बाजुस | नो पार्कीग |
| ५ | युनिटॉस चौक ते कुमार सन्सार सोसायटी | युनिटॉस चौक ते कुमार सन्सार सोसायटी पर्यंत सार्वजनिक रोडच्या दोन्ही बाजुस | नो पार्कीग |
| ६ | दगडुदादा कामठे पाटील चौक ते मेरी लीड्स हायस्कुल | स्कुबीज स्कुलचे गेट समोर गेटचे भिंतीलगत दोन्ही बाजुस प्रत्येकी २५ फुट असे एकुण ५० फुट | फक्त दुचाकी पार्कीग |
| | | वरील जागा वगळुन दगडुदादा कामठे पाटील चौक ते मेरी लीड्स हायस्कुल पर्यंत सार्वजनिक रोडचे दोन्ही बाजुस | नो पार्कीग |
| ७ | दगडुदादा कामठे पाटील चौक ते वेल्वीशर सोसा. | अल्कॉन राईस सोसायटी गेटचे उजव्या बाजुस ३५ फुट दुचाकी व ६५ फुट चारचाकी पार्किग | दुचाकी व चारचाकी पार्किग |
| | | शोभा गोरनेट ओरीयन सोसायटी गेटचे डाव्या बाजुस २५ फुट दुचाकी व २५ फुट चारचाकी पार्किग | दुचाकी व चारचाकी पार्किग |
| | | शोभा आयवरी सोसायटी गेटचे उजव्या बाजुस ४० फुट अंतरापर्यंत | फक्त दुचाकी पार्कीग |
| | | वरील जागा वगळुन दगडुदादा कामठे पाटील चौक ते वेल्वीशर सोसायटी पर्यंत रोडच्या दोन्ही बाजुस | नो पार्कीग |

( अमोल झेंडे )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक शाखा, पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१

२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- १. सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक पुणे शहर.**

**२. पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

**३. प्रभारी अधिकारी, कोंढवा** वाहतुक विभाग, पुणे शहर.

२/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणे फलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

**४. पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.

**५. पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.

**६. मा. सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे

२/-सदर ठिकाणी वरीलप्रमाणे फलक बसविणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे.

**प्रति**, **व्यवस्थापक**, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे

२/-सदरचा आदेश राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती इकडील कार्यालयात पाठविण्याची विनंती आहे.